● शुक्रवार, दि २७ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६६ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ · 8390098886 · yuva.aadarsh@gmail.com · 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ · https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ · https://twitter.com/Yuva_aadarshjln/ · RNI: MAHMAR/2019/78282

### राज्यपालपदी निवड झाल्याबद्दल हरिभाऊ बागडे यांचा परतूर येथे नागरी सत्कार

## मराठवाड्यात क्वचितच एवढे सुंदर नाट्यगृह पाहायला मिळेल

### राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केले भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृहाच्या इमारत कामाचे कौतुक; नाट्यगृह इमारतीचे लोकार्पण







**परतूर । प्रतिनिधी -** मराठवाड्यात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने गेलो परंतु परतुर येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने उभारण्यात आलेली नाट्यगृहाची ही वास्तू अत्यंत अप्रतिम असून संपूर्ण मराठवाड्यात अशी वास्तू कुठेही नाही त्यात ज्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्कारामध्ये आम्ही लहानचे मोठे झालो त्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या नावाने नाट्यगृहाची ही इमारत उभी राहिली आहे याचा अत्याधिक आनंद असल्याचे प्रतिपादन राजस्थानचे नवनिर्वाचित राज्यपाल व मराठवाड्याचे भूमिपुत्र हरिभाऊ बागडे यांनी केले

परतुर येथे माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून साकार झालेल्या भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृह इमारतीचे राजस्थानचे नवनिर्वाचित राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी राज्यपाल श्री बागडे बोलत होते यावेळी मंचावर आमदार बबनराव लोणीकर, राहुल लोणीकर, जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा मीना यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना राज्यपाल श्री बागडे म्हणाले की मागील अनेक वर्षांपासून तत्वाचे आणि शिस्तीचे राजकारण केले असून कोणालाही त्रास होणार नाही याची काय खबरदारी घेतली आहे वयाची ८० वर्षे पूर्ण झाल्यामुळे पुढील काळात राजकीय क्षेत्रात काम करता येईल किंवा नाही याबाबत साशंकता असल्यामुळे दीड वर्षांपूर्वीच राजकारणातून निवृत्त होण्याचा निर्णय जाहीर केला होता परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तालमीत तयार झालेलो असल्यामुळे सातत्याने लोकांसाठी काहीतरी चांगले करण्याची प्रबळ इच्छा आजही मनामध्ये आहे असेही यावेळी हरिभाऊ बागडे म्हणाले

यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की आपण मुंडे म हाजन बागडे यांच्या विकासाभिमुख नेतृत्वात आपण राजकारणाची सुरुवात केले असून माझ्या परतुर विधानसभा मतदारसंघात विकासाभिमुख कामासाठी सातत्याने प्रयत्नशील राहत आलो आहे त्यामुळेच मतदार संघातील प्रत्येक गावाला डांबरीकरणाचा रस्ता भव्य दिव्य सभामंडप गावांतर्गत सिमेंट रस्ते शुद्ध पिण्याच्या पाण्याची योजना यासह गाव वाडी वस्ती तांड्याच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिलो आहे त्यामागे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे प्रमोद महाजन यांच्यासह खऱ्या अर्थाने माझे राजकीय गुरु असणारे हरिभाऊ बागडे यांचे पाठबळ कायम राहिले असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांना स्पष्ट केले

राजकीय क्षेत्रात काम करत असताना अनेक अडीअडचणींचा सामना करावा लागला त्या प्रत्येक प्रसंगात हरिभाऊ बागडे नाना कायम माझ्या पाठीशी उभे राहिले अनेक सुखदुःखाच्या प्रसंगात त्यांची अनमोल साथ व भक्कम पाठिंब्यासह मोलाचे मार्गदर्शन सातत्याने मिळत राहिले त्यामुळेच गावातील सरपंच पदापासून राज्याच्या कॅबिनेट मंत्री पदापर्यंत मजल मारू शकलो असे देखील यावेळी लोणीकरांनी स्पष्ट केले पुढे बोलताना ते म्हणाले की प्रत्येक अडीअडचणीच्या काळात हरिभाऊंच्या रूपाने एक भक्कम पाठबळ असणारा नेता कायम माझ्या पाठीशी उभा राहिला राज्याचे मंत्री आणि जालना जिल्ह्याचे पालकमंत्री असताना त्यांनी मला नेहम ीच भक्कम पाठबळ दिले असेही यावेळी लोणीकर यांनी स्पष्ट केले

पक्षामध्ये किती शिस्तबद्ध पद्धतीने काम केले पाहिजे याचे धडे आम्ही कायम हरिभाऊ नाना बागडे यांच्या माध्यमातून घेत आलो आहोत राजकीय क्षेत्रात काम करत असताना कायम त्यांचा आशीर्वाद आणि पाठिंबा लोणीकर कुटुंबीयांना लाभला आहे अशा शब्दात राहुल लोणीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले पुढे बोलताना ते म्हणाले की म राठवाडा ही साधू संतांची भूमी असून या भूमीतून अनेक कर्तृत्ववान माणसे उभे राहिले आहेत साधू संतांच्या भूमीचा आशीर्वाद सोबत घेऊन मराठवाड्याची भूमिपुत्र हरिभाऊ नाना बागडे यांच्या रूपाने महाराष्ट्र बाहेर राजस्थान मध्ये देखील निश्चितपणे मराठवाड्याचा नावलौकिक वाढवतील त्यांच्या हातून निश्चितपणे सकारात्मक आणि चांगल्या स्वरूपाचे कामे होतील शुभेच्छा देखील यावेळी राहुल लोणीकर यांनी यावेळी आपल्या मनोगत मध्ये दिल्या

राजस्थानचे महामहिम राज्यपाल मध्ये निवड झाल्याबद्दल हरिभाऊ बागडे यांचा आमदार बबनराव लोणीकर राहुल लोणीकर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते परतूर येथे नागरी सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले तर आमदार बबनराव लोणीकर राहुल लोणीकर यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी सुभाषराव अंभोरे, डॉ शेषराव बाहेकर, अंकुशराव बोराडे, सोपानराव जगताप, अशोकराव मसलकर, केशवराव बरकुले, दत्तात्रय झवर, बळीराम कडपे, बद्रीनारायण खवणे, रामराव लावणीकर, कृष्णकांत अष्टेकर, आप्पा सुरेश मंत्री, गणेश खवणे, रमेश भापकर, सतीश निर्वळ, विश्वजीत खरात, संदीप गोरे, राजेश मोरे, संपत टकले, शत्रुघ्न कणसे, पंजाबराव बोराडे, संभाजी वारे, ज्ञानेश्वर शेजुळ, जिजाबाई जाधव, तुकाराम सोळंके, गजानन राजबिंडे, माणिकराव वाघमारे, नरसिंग राठोड, डॉ प्रमोद आकात, मोहन आढे, संतोष शेवाळे, दिनेश मुलाने, डॉ संजय पुरी, सर्जेराव जाधव, डॉ भानुदास कदम, रवी सोळंके, गणेश सोळंके, अशोकराव बरकुले, विकास पालवे, सुदाम प्रधान, डॉ स्वप्निल मंत्री, शहाजी राक्षे, संदीप बाहेकर, विठ्ठलराव बरकुले, सुधाकर सातोनकर, मेराज खतीब, अंकुशराव बोबडे, रमेश महाराज वाघ, कार्यकारी अभियंता श्री मिठेवाड, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार प्रतिभा गोरे, तहसीलदार सोनाली जोंधळे, ॲड. राजेश अंभोरे, भगवान कांबळे, विलास घोडके, बंडू मानवतकर, प्रकाश चव्हाण, कृष्णा आरगडे, विठ्ठलराव काळे, किशोर हनवते, गजानन लोणीकर, पद्माकर कवडे, रामकिसन बोडके, रमेश राठोड, प्रसादराव गडदे, तानाजी शेंडगे, माऊली कोंडके, माऊली सोळंके, गणेशराव सोनवणे, सत्यनारायण अग्रवाल, ओम मोर, दिलीप जोशी, राजेंद्र वायाळ, विक्रम उफाड, गजानन उफाड, जगदीश पडोळकर, राजेश राठोड, उद्धव वायाळ, नरेश कांबळे, मलिक कुरेशी, नंदकुमार घोडे, पंजाब पुणेकर, गोविंदराव केंधळे आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सहदेव मोरे यांनी केले तर आभार सतीश निर्वळ यांनी मानले.

---

युवा आदर्श

**अ पुरा ...**

झुंजार बरसे धारा
थैमान घालतो पुरा
नवस पावसासाठी
हिशेब केलांस पुरा
गतवर्षी तू नाराज
बरसला का अपुरा
अभिषेक महादेवा
दे आमंत्रण महापुरा
ढग विराट गडगडाट
वाजवी जणू त्वंपुरा
तांडव करी भयावह
काय सांगतो शंकरा
त्रागा करशी कसला
फाडलेस का अंबरा
अस्तव्यस्त नर्तकास
कुणी तरी बा आवरा
कळवळून सांगे सारे
विश्रांती घ्यावी जरा
तोडशी धरण बंधना
झाला का निलाजरा
कसली रे लगीनघाई
गडबड करे एकसुरा
वर्षा ऋतू नुकता सुरु
उरला आहे उणापुरा

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

## मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेत सावळा गोंधळ

**मंठा । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजने अंतर्गत मंठा तालुक्यात देण्यात येत असलेल्या उम ेदवाराच्या नियुक्त्या ह्या जालना शिक्षणाधिकारी (प्राथमि क) व पंचायत समिती कार्यालय मंठा येथील कर्मचारी यांच्या संगणमताने देण्यात येत असल्याचा आरोप करत यात आर्थिक देवाण घेवाण झाल्याची चर्चा इतर युवा सुशिक्षित बेरोजगार सुरु आहे. त्यामुळे या प्रकाराची चौकशी करुन सुशिक्षीत बेरोजगारांना न्याय द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नियुक्त्या ह्या शिक्षकांच्या मुलांना, केंद्र प्रमुखाच्या मुलांना तसेच अधिकाऱ्यांच्या नातलगांना देण्यात आल्या आहेत. परिणामी सर्व साम ान्य सुशिक्षित बेरोजगार योजनेपासुन बेरोजगारच राहत आहे. उमेदवार पात्र असुन सुद्धा अपात्र होत आहेत. या सर्व प्रकाराची चौकशी करुन न्यायय देण्याची मागणी करण्यात आली असून निवेदनावर जगदीश गुलाबराव राठोड, गोपाल उध्दवराव जाधव यांची स्वाक्षरी आहे.

## मोतीबाग चौपाटीवरील अतिक्रमण हटणार!

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मोती बाग चौपाटीवर खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्या दुकानदारांनी अतिक्रमण केले असून यामुळे चौपाटीवर येणाऱ्या नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी या खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्यांना त्यांना ठरवून दिलेल्या जागेवरच व्यवसाय करण्याचे सूचित करण्यासह चौपाटीवर होत असलेले अतिक्रमण काढण्याची मागणी ॲड. राहुल चव्हाण यांनी केली. यासंदर्भात चौपाटीवरील अतिक्रमण हे तात्काळ हटविण्याची कारवाई करण्यात येईल व फेरीवाला धोरणाप्रमाणे ठरवून दिल्यानुसार हातगाडींना जागा देण्यात येईल व नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेण्यात येणार असल्याचे शहर मनपा उपायुक्त नंदा गायकवाड यांनी युवा आदर्शशी बोलतांना सांगितले आहे.

# अन् राजकारण्यांना जाग आली!

### जालना शहरातील मुख्य रस्त्यावरील विद्युत खांब बाजूला करण्यासंदर्भात भास्कर दानवे यांचे जिल्हाधिकारी व आयुक्तांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मुख्य रस्त्याच्या मध्ये आलेले विद्युत खांब तात्काळ बाजुला करण्यात यावे या मागणीचे निवेदना भारतीय जनता पक्षाचे जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांनी शहर महानगरपालिका आयुक्तानां दिले आहे. या संदर्भात युवा आदर्शने 'माझ्यामुळेच विकास होतोय म्हणणारे कुठयं, रस्त्यांची बोगस अन् अर्धवट कामामुळे शहरवासिय त्रस्त' या मथळ्याखाली बुधवार (दि २५) रोजी वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्तात शहरातील रस्त्याचे हाल, साचलेले पाणी, रस्त्याच्या मधोमध आलेले विद्युत खांब व त्यामुळे जेल कर्मचाऱ्याचा झालेले मृत्यू यासह विविध मुद्यांचा समावेश होता. त्याच मुद्यांचा आधार घेत तातडीने बुधवार (दि २५) रोजी भाजपाचे भास्कर दानवे यांनी जालना जिल्हाधिकारी यांच्यासह महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.

भास्कर दानवे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना शहरातील मुख्य रस्त्यावरील उभे असलेले विद्युत खांब तात्काळ बाजूला करण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी तात्काळ निर्देश द्यावेत.

माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रयत्नातून जालना शहरातील अनेक मुख्य रस्त्यासहित कॉलनीमधील छोट्या छोट्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण झाले आहे. परंतु अनेक अनेक मुख्य रस्त्यावरील जसे की टाऊन हॉल समोरील रस्ता, महात्मा गांधी चौक ते रेल्वे स्टेशन रोड पर्यंतचा रस्ता, कन्हैय्या नगर ते बायपास पर्यंतचा रस्ता, देऊळगावराजा कडे जाणारा मुख्य रस्ता, रेल्वे स्टेशन ते मंमादेवी, मस्तगडपर्यंतचा रस्ता, रेल्वे स्टेशन ते रेल्वे उड्डाण पुलापर्यंतचा रस्ता, काळे चौक ते कोठारी यांच्या शाळेकडे जाणारा रस्ता, रेल्वे उड्डाणपूल ते अंबड चौफुली पर्यंतचा रस्ता, या प्रमुख रस्त्यासह शहरातील अनेक रस्त्यावर सिमेंट कॉंक्रीटची कामे माजी मंत्री रावसाहेब दानवे यांच्या प्रयत्नातून झाले आहे, परंतु रस्त्यावरील विद्युत खांब बाजूला न करता तसेच रस्त्यावर विद्युत खांब, रोहित्र (डी.पी.) जसे ती तशीच उभी असतांना रस्त्याची कामे केली आहेत. महात्मा गांधी चौक ते रेल्वे स्टेशन चौकाकडे जाणारा रस्ता तर जालना शहर महानगरपालिके समोरून जातो, एका बाजूने तर चार चाकी वाहनाला चालणे शक्य होत नाही, अंबड चौफुली ते रेल्वे उड्डाणपुलापर्यंतच्या रस्त्यावरील

पान २ वर


युवा आदर्श

'माझ्यामुळे'च विकास होतोय म्हणणारे कुठयं?

रस्त्यांची बोगस अन् अर्धवट कामामुळे शहरवासिय त्रस्त!

खाली दिलेल्या लिंक वर जाऊन आपण संपुर्ण वृत्त पाहू शकता...
https://epaper.yuvaadarsh.com/view/33/25-september-2024/4

# संपादकीय

## 'गुगल' गुरू

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा म हास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे. अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# कर्मयोगी अंकुशराव टोपे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कवी ज्ञानेश वाकुडकर यांच्या काव्य मैफिलीत रसिक मंत्रमुग्ध




**जालना । प्रतिनिधी -** तुझ्या टपोऱ्या डोळ्यात माझं इवलसं गाव'...तसेच 'पावसाने तुझा घात केला' अशा प्रेम कवितेसह वास्तव जगण्याचे भान देणारी ' बळीराजाच्या मुला रे !'
अशा विविध कवितांचे प्रभावी सादरीकरण करीत प्रसिद्ध कवी ज्ञानेश वाकुडकर यांच्या ' सखी साजनी ' कार्यक्रमाने उपस्थितांना अंतर्मुख केले.

शहरातील यशवंतराव चव्हाण साहित्यिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि माजी विद्यार्थी मत्स्योदरी शिक्षण संस्था जालना यांच्यातर्फे कर्मयोगी अंकुशराव टोपे यांच्या जयंतीनिमित्त कलश सीड्स सभागृहात आयोजित कार्यक्रमात ख्यातनाम कवी ज्ञानेश वाकुडकर यांच्या देश विदेशात गाजलेली ' सखे साजनी ' ही काव्य मैफलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार तथा यशवंतराव चव्हाण साहित्यिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष आमदार राजेश टोपे हे होते. कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष शिवकुमार बैजल, यशवंतराव चव्हाण साहित्यिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे सचिव डॉ. बी.आर.गायकवाड, कार्यवाह प्रा.बसवराज कोरे, माजी विद्यार्थी प्रतिनिधी डॉ. यशवंत सोनुने यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात कविता सादर करताना कवी वाकुडकर यांनी प्रेमविषयक भावतरल अनुभव कसे येतात आणि प्रत्येकाच्या मनात दडलेली एक ' सखी' असते, तिच्या आठवणी असतात अशा संदर्भाने येणाऱ्या ' तुझ्या टपोऱ्या डोळ्यातील माझं इवलसं गाव' या दीर्घ कवितेला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमात कविता सादरीकरण करताना आजच्या राजकीय घटनांवर भाष्य करणाऱ्या कोपरखळ्या मारीत शेतकऱ्याचे प्रश्न आरक्षण आणि धर्मा धर्मात वितंडवाद कसा यावर मार्मिक भाष्य कवी वाकुडकर यांनी टिपत उपस्थितांना चांगलेच खळखळून हसविले. कार्यक्रमात विविध प्रेमविषयक कविता सादर करीत शेवटी वास्तवाचे भान जपता आले पाहिजे,असे सांगून ' बळीराजाचे राज्य येवो ' अशी प्रार्थना ही ' बळीराजाच्या मुला रे ' या कविता सादरीकरणाने वास्तवाचा वेध घेत उपस्थितांना विषयाचे गांभीर्य लक्षात आणून दिले. कार्यक्रमात लेखिका रेखा बैजल, रावसाहेब ढवळे, कादंबरीकार छबुराव भांडवलकर, कवी राम गायकवाड, संजीवनी तडेगावकर, पंढरीनाथ सारके, सुनील लोणकर, राम कदम, विद्या दिवटे, यशवंत सोनुने, सुहास सदाव्रते, प्रभाकर शेळके, पंडीत रानमाळ, राम रौनेकर, विजय कुमठेकर, नारायण खरात,अशोक डोरले, शशिकांत पाटील, कैलास भाले, रेखा गतखणे, दिगंबर दाते, अशोक खेडकर, राज रणधीर, विनोद जैतमहाल, श्रीकांत गायकवाड, गणेश खरात, एकनाथ शिंदे, दीपक राखुंडे, विजय जाधव, प्रा.रंगनाथ खेडेकर यांचा आमदार राजेश टोपे, कवी ज्ञानेश वाकुडकर यांच्या हस्ते साहित्य सेवागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात कार्यवाह प्रा.बसवराज कोरे यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची भूमिका विशद केली. कार्यक्रमात माजी नगराध्यक्ष शिवकुमार बैजल यांनी विचार मांडत स्व.अंकुशराव टोपे यांच्याबद्दलची कृतज्ञता आणि कार्य करण्याची प्रेरणा कशाप्रकारे आहे, असे श्री.बैजल यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुहास सदाव्रते यांनी केले. उपस्थितांचे आभार डॉ. विद्या दिवटे यांनी मानले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, प्राचार्य डॉ. मिलिंद पंडित, डॉ. सुजाता देवरे, ॲड. कल्पना त्रिभुवन , प्राचार्य श्रीकांत लहाणे, वैशाली सरदार, पंडित लवटे, दिनेश लोहिया, सुनील पवार, डॉ. शंकर तिकांडे, डॉ. मोहन शिदे, श्री.घोडके, श्री. म्हस्के आणि शहरातील साहित्य रसिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

मत्स्योदरी शिक्षण संस्थेने २००५ मध्ये मसाप साहित्य संमेलन कर्मयोगी अंकुशराव टोपे साहेब यांच्या मार्गदर्शनात पार पडले होते. तेव्हापासून आज वीस वर्ष होत असून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची भूमिका आणि कार्य यशस्वीपणे करीत कवी,लेखक साहित्यिक यांना हक्काचे व्यासपीठ निर्माण झाले असल्याचे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा आमदार राजेश टोपे यांनी कार्यक्रमात बोलताना सांगितले.

# सिद्धार्थ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

जाफराबाद । प्रतिनिधी - येथील सिद्धार्थ कला, वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना दिन विविध कार्यक्रम घेऊन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख हे होते प्रमुख पाहुणे भोकरदन/ जाफराबाद राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा .डॉ. अनिल मगर हे होते. तसेच वरिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. सुनिल मेढे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. संजयजी साळवे यांनी केले. आपल्या प्रास्ताविक पर भाषणात प्रा. साळवे यांनी राष्ट्रीय सेवा योजना ही उघड्यावरची कार्यशाळा असून राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. राष्ट्रीय सेवा योजना राष्ट्रीय एकात्मतेचे सशक्त साधन मानले गेले आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे सामाजिक घटकांना एका राष्ट्रीय कार्यात बांधते. राष्ट्रीय सेवा योजना ही युवा चळवळ अखंड सुरू राहावी यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार मूलभूत योजनांचा सतत प्रचार व प्रसार करीत असते.

या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अनिल मगर यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रिदवाक्य NOT ME BUT YOU_r माझ्यासाठी नसून इतरांसाठी आहे .हे लोकशाही जीवनाचे सार प्रतिबिंबित करते आणि गरज किंवा निस्वार्थ सेवा दुसऱ्या व्यक्तीच्या दृष्टिकोनाची प्रशंसा करते आणि सहमानवांचा विचार देखील करते .ते पुढे म्हणाले स्वयंसेवी सामुदायिक सेवेद्वारे विद्यार्थी युवकांचे व्यक्तिमत्व आणि चारित्र्य विकसित करण्याच्या प्राथमिक उद्देशाने १९६९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजना( छ.ड.ड.) सुरू करण्यात आली प्रा. डॉ. अनिल मगर यांनी गीतात्मक वक्तव्यातून राष्ट्रीय सेवा योजनेचे गीत विद्यार्थ्यांसमोर गाऊन दाखवले व राष्ट्रीय सेवा योजना ही देशसेवा असून ती समाजसेवा सुद्धा आहे असे मत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रतीक कसे निर्माण झाले व कशासाठी निर्माण केले याचा सविस्तर आढावा घेतला.१९९२ मध्ये सरकारने स्वीकारलेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यात भारतीय विद्यार्थ्यांनां एका वर्षासाठी सामाजिक आणि शैक्षणिक विकासासाकरीता ही योजना सुरू करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेचा मुख्य उद्देश काय आहे, राष्ट्रीय सेवा योजनेचे फायदे काय आहेत, राष्ट्रीय सेवा योजनेचे ब्रिदवाक्य काय दर्शवते अशा नाविन्यपूर्ण राष्ट्रीय सेवा योजनेचे सृजनात्मक आणि रचनात्मक कार्याविषयी आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. शालिनी वाघ कु. हर्षदा तांबेकर या विद्यार्थिनींनी केले कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हिंदी विभागाचे प्रा. अनिल वैद्य यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते व कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.




# तळणी येथे स्वच्छता ही सेवा कार्यक्रम संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालयाच्या अंतर्गत चालणाऱ्या माय भारत आणि संत भगवान बाबा युवा मंडळाच्या वतीने तळणी येथील विश्वनाथ विद्यालयात स्वच्छता ही सेवा कार्यक्रम पार पडला.

यावेळी शिक्षक आर. बी. ढवळे, ए. के. पांचाळ, जी. ए. देशमुख, जी. एस. मापारी, एस. जी. जाधव, ए. एस. फुपाटे, वाय. डी. मापारी, यांची उपस्थिती होती. मुख्याध्यापक एस. पी. लोढे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी स्वच्छतेची शपथ घेतली. स्वच्छता ही सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी पटवून दिले. शपथवाचनानंतर विद्यालयाच्या परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्साहाने परिसरातील कचरा गोळा केला आणि स्वच्छता राखण्याचे वचन दिले. या उपक्रमाद्वारे शाळेच्या परिसराची स्वच्छता करण्यात आली. संत भगवान बाबा युवा मंडळाचे अध्यक्ष वैभव कांगणे यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छता ही फक्त शाळा किंवा घरापुरती मर्यादित नसून समाजाच्या विकासासाठी देखील आवश्यक असल्याचे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे नियम पाळण्याचे आणि समाजात स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी स्वच्छ परिसर टिकविण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. पी. लोढे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात स्वच्छतेच्या शपथवाचनाने झाली. असे जिल्हा युवा अधिकारी, नेहरु युवा केंद्र, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## गुरुपिंपरी येथील शेतकऱ्यांचे मागील वर्षीचे दुष्काळी अनुदान तात्काळ मंजूर करा - सतीश कोल्हे

**जालना । प्रतिनिधी -** मौजे गुरुपिंपरी ता.घनसावंगी जि.जालना येथील ६१ शेतकऱ्यांचे मागील वर्षीचे दुष्काळी अनुदान तात्काळ मंजूर करा अन्यथा २ ऑक्टोबर २०२४ रोजी उपोषणाला बसणार असे निवेदनसतीश कोल्हे आणि ६१ शेतकऱ्यांनी मा.जिल्हाधिकारी, जालना यांना दिले आहे.
निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, मौजे गुरुपिंपरी ता.घनसावंगी येथील बहुसंख्य शेतकऱ्यांना मागील वर्षीचे दुष्काळी अनुदान मिळाले आहे, परंतु ६१ शेतकऱ्यांना अद्यापही दुष्काळी अनुदान मिळाले नाही. दुष्काळी अनुदान मिळणेसाठी गावचे ग्रामविकास अधिकारी श्री.रूपणार, तलाठी श्रीमती खर्जुले व घनसावंगीच्या तहसीलदार मॅडम यांना वारंवार भेटून दुष्काळी अनुदान मिळणेसाठी विनंती केली आहे. परंतु दुष्काळी अनुदान लवकरच मिळेल असेच उत्तर सर्व अधिकाऱ्यांकडून मिळते, पण अद्यापही दुष्काळी अनुदान मिळाले नसल्याने सदरील ६१ शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे दि.२३/०९/२०२४ रोजी सर्व शेतकऱ्यांनी मा.जिल्हाधिकारी, जालना यांना लेखी निवेदन देऊन दुष्काळी अनुदान तात्काळ मंजूर करण्याची विनंती केली व दि. २ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अनुदान मंजूर केले नाहीतर दि. २ ऑक्टोबर २०२४ रोजी पासून जिल्हाधिकारी कार्यालय, जालना समोर उपोषणास बसण्याचा इशारा ही दिला.
निवेदनाची तात्काळ दखल घेऊन मा.जिल्हाधिकारी, जालना यांनी मा.निवासी उप जिल्हाधिकारी, जालना व मा. तहसीलदार, घनसावंगी यांना तपासून तात्काळ कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

पान १ वरुन

## अन् राजकारण्यांना जाग आली!

विवेकानंद विद्यालयासमोरील मुख्य रस्त्यावरील मधोमध उभे असलेल्या विद्युत खांबाला जेल पोलीस कर्मचारी जितेंद्र बोडके यांची दुचाकी धडकून त्यांचे नुकतेच निधन झाले आहे. विद्युत खांब रस्त्याच्या मधोमध उभे असल्यामुळे विद्युत खांबाला धडक होत असल्यामुळे दुचाकीस्वारांचे अपघात होत आहेत. दुचाकीस्वाराचा विद्युत खांबाला धडकून अपघात होऊ नये म्हणून जालना शहरातील सर्व रस्त्यावरील मधोमध उभे असलेले विद्युत खांब बाजूला करणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा होणाऱ्या अपघाताला महानगरपालिका जबाबदार राहिल असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### बारा बलुतेदार सेवा संघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; पीएम विश्वकर्मा कौशल्यविकास योजने बाबत केली तक्रार

# पीएम विश्वकर्मा कौशल्यविकास योजना खास नव्हे फक्त बोलबच्चण प्रशिक्षणार्थींचा भत्ता बुडवला? भालचंद्र गोरे

**जालना । प्रतिनिधी -**पीएम विश्वकर्मा कौशल्य विकास योजनेचा लाभ मिळत नसल्याची निवेदनाद्वारे बारा बलुतेदार सेवा संघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे.या योजनेसाठी अनेकांनी प्रशिक्षण घेतलं आहे.पण या योजनेच्या नावातच बोल बच्चन दिसून येत असून प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींना अजूनही प्रशिक्षण काळातील ५ हजार रुपयांचा भत्ता किंवा मानधन मिळालेलं नाही. या घटनेला जवळपास वर्ष उलटले आहे तरीही मानधन भत्ता मिळत नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. टूल किटसाठी १५ हजार रुपये आणि व्यवसाय करण्यासाठी १ लाख रुपयांचे कर्जही देण्यात येणार होते तसा अध्यादेश देखील काढण्यात आला मात्र प्रशिक्षण घेतलेल्यांना त्याचाही फायदा झालेला नाही.

बारा बलुतेदारर जेव्हा कर्जासाठी बँकेत चकरा मारत आहेत तेव्हा बँक अधिकारी उडवा उडवीची उत्तर देत आहे त्यामुळे बारा बलुतेदार सरकार विरोधात संताप व्यक्त करत आहेत.

आज दि.२६ गुरूवार रोजी दुपारी दोन वा.च्या सुमारास बारा बलुतेदार सेवा संघाच्या वतीने निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

P.M. विश्वकर्मा कौशल्य विकास योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ मिळत नसल्याबाबत जालना जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की भगवान विश्वकर्मा यांच्या नावाने संपूर्ण भारतात p.m. विश्वकर्मा कौशल्य विकास योजना भारत सरकारद्वारे अर्थसंकल्पित केलेली आहे. सदरील योजना (च.ड.च.ए.) कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय (M.S.D.E.) आणि वित्तीय सेवा विभाग (D.F.S.) अर्थ मंत्रालय चजऋ भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. M.S.M.E. योजनेचे नोडल मंत्रालय आहे. या योजनेचे उद्दिष्ट आहे की, कारागिरांना विश्वकर्मा म्हणून मान्यता देणे,

त्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी कौशल्य वृध्दी प्रदान करणे, सांस्कृतिक प्रथा पिढीगत कौशल्य आणि गुरुशिष्य परंपरा जतन करण्यासाठी हातभार लावणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. सदरील योजना लागू झाल्यापासून जालना जिल्ह्यातील कारागिरांनी विविध प्रशिक्षण सेंटरवर जावून प्रशिक्षण घेतले त्याचा कालावधी ८ ते ९ महिन्याचा कालावधी होत असून ही प्रशिक्षण घेतलेल्या ८०% लोकांना ४०००/-रु. प्रमाणे प्रशिक्षण कालावधीतील भत्ता व कारागिरांना देण्यात येणारी १५०००/- रुपयांची टूल किट अजुनही मिळालेली नाही. तसेच जिल्ह्यातील विविध राष्ट्रीयकृत बँकांकडून व्यवसायासाठी विनातारण कर्ज स्वरुपात देण्यात येणारे १ लाख रुपये कुठलीही बँक देत नाही. आम्ही काही बँकांशी संपर्क साधला असता आमच्याकडे कुठलाही जी.आर. नसल्याचे सांगत उडवाउडवीची उत्तरे संबंधिताकडून देण्यात येत आहेत. या कर्जासाठी क्रेडिट गॅरंटी भारत सरकारने घेतलेली असताना बँकांना कर्ज देणे बंधनकारक आहे. जिल्ह्यातील कारगिरांना ८० ते ९० कि.मी. प्रवास करुन प्रशिक्षण घेतलेल आहे. त्यामुळे ही योजना म्हणजे दिशाभुल करण्यासाठी केलेली आहे का असा प्रश्न कारागिरांकडून उपस्थित केला जात आहे.

तरी आपण स्वतः जातीने झ.च. कौशल्य विकास योजनेत लक्ष घालून संबंधित बँका व महाराष्ट्र राज्य खादीग्राम उद्योग मंडळ आणि जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्याशी संपर्क साधून बारा बलुतेदार समाजातील कारागिरांना न्याय मिळवून द्यावा अन्यथा आपल्या कार्यालयासमोर महाधरणे आंदोलन करण्यात येईल असल्याच्या इशारा निवेदनाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांना देण्यात आला. यावेळी भालचंद्र गोरे (प्रदेशाध्यक्ष), बालासाहेब राजूरकर (प्रदेश उपाध्यक्ष), उद्धव अर्जुन राऊत, महेश राम शिंदे, भानुदास प्रल्हाद कचरे, शिवपाल शांतीनाथ वाघमारे, ईश्वर सुभाष जाधव, संतोष नामदेव वाघमारे, विलास सुभाषराव गुंगे, ब्रह्मानंद सुभाष बोर्डे, सागर सुभाषराव भुंगे, ऋषिकेश दगडूबा जाधव, कैलास भगवान राऊत, विनायक संतोष राऊत, ज्ञानेश्वर संतराम वखरे, सह इः पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



बालविकास प्राथमिक शाळेत सखी सावित्री समिती स्थापन

# अध्यक्षपदी विद्याताई कुलकर्णी तर सुजाता परदेशी सचिव

**जालना । प्रतिनिधी -** कसबा येथील महिला मंडळ जुना जालना संचलित श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत शासन निर्णयानुसार सखी सावित्री समितीची स्थापना करण्यात आली असून, अध्यक्षपदी सौ. विद्याताई कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. या समितीत सचिव श्रीमती सुजाता परदेशी, सहशिक्षिका श्रीमती छाया मुधोळकर, सौ. आशा भाले , सौ. विद्या झिने, सौ. शीला मगरे, सौ. संध्या चाफेकानडे यांचा समावेश समावेश आहे. समिती स्थापनेनंतर अध्यक्ष सौ. विद्याताई कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली पहिली बैठक



घेण्यात आली. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता परदेशी यांची उपस्थिती होती. प्रारंभी पदाधिकारी व सदस्यांचा परिचय करून देण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे शिक्षण, आरोग्य व सुरक्षिततेबाबत करावयाच्या उपाय योजनांबद्दल माहिती देण्यात आली. तसेच शालेय परिसराच्या आजूबाजूला बालविवाह रोखण्यासाठी कोण कोणत्या योजना राबवता येतील, यावर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना सामाजिक व भावनिक अध्ययन उत्तम रीतीने व्हावे, यासाठी विविध उपक्रम राबण्याचा निर्णय घेण्यात आला. सूत्रसंचालन श्रीमती छाया मुधोळकर यांनी केले तर आभार श्रीमती पल्लवी सरकाटे यांनी मानले. बैठकीला सहशिक्षक निलेश सिंदखेडकर, विलास मोहिते यांची उपस्थिती होती.

सतीश घाटगे पाटलांच्या प्रयत्नाला यश

# गरीब कुटुंबियांना मंजूर झाले घरकुल

**जालना । प्रतिनिधी -** ग्रामीण भागातील प्रत्येक घटकातील गरीब कुटुंबांना पक्के घर देण्यासाठी सरकारकडून विविध प्रकारच्या घरकुल योजना राबविण्यात येतात. दलित कुटुंबासाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास आणि ओबीसी प्रवर्गातील गरीब कुटुंबासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजनेअंतर्गत घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील सुमारे ३000 गरीब कुटुंबांना घरकुल मंजूर करून देण्यात भाजप नेते सतीश घाटगे यांना यश आले आहे. दोन्ही योजनेतील पात्र लाभार्थ्यांना त्यांच्यावतीने घरकुल मंजूर झाल्याचे पत्र देण्यात आले आहे.

अनेक वर्षापासून घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील दलित कुटुंब तसेच ओबीसी प्रवर्गातील अनेक गरीब कुटुंब घरकुल योजनेपासून वंचित होते. या खऱ्या गरजू आणि गरीब कुटुंबांना हक्काचे घरकुल मिळवून देण्यासाठी सतीश घाटगे यांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर करून त्यांचा शासनाकडे पालकमंत्री अतुल सावे यांच्यामार्फत पाठपुरावा केला. अतुल सावे यांच्या सहकार्यातून व सतीश घाटगे पाटील यांच्या प्रयत्नामुळे घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील ३000 गरीब कुटुंबांना रमाई आवास व यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेतून घरकुल मंजूर झाले आहे. घरकुल मंजुर झालेल्या लाभार्थींना आनंद व्यक्त करत सतीश घाटगे व सरकारचे



आभार मानले.

**सरकारचे आणि प्रशासनामुळे हे शक्य झाले**

प्रत्येक गरिबाला पक्के घर देण्याचे ध्येय सरकारचे आहे. म्हणून गरीब कुटुंबासाठी निधीची तरतूद करून सर्वांना घरे देण्यासाठी घरकुल योजना मोठ्या प्रमाणात राबविण्यात येत आहे. खऱ्या गरीब कुटुंबाला घरकुल मंजूर करून देता आले याचे समाधान आहे. सरकार आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांचे लाभार्थींच्या वतीने भाजपाचे नेते तथा समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी आभार मानले.

# मारवाड़ी संमेलनचे प्रांतीय महामंत्री सुदेश करवा व पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा

**जालना । प्रतिनिधी -** संपूर्ण राज्यात सामजिक, सेवाभावी कार्य करणाऱ्या महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी संमेलनाच्या प्रांतीय कार्यकारणीच्या पदग्रहण सोहळा विदर्भातील अकोला येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. त्यात प्रांतीय महामंत्री सुदेश करवा व पदाधिकाऱ्यांनी राज्यभरातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पदभार स्वीकारला.

खंडेलवाल भवनात संपन्न झालेल्या या पदग्रहण सोहळ्याचे उद्घाटन माजी कॅबिनेट मंत्री रमेशचंद्र बंग नागपूर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया हे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून खा. अनुप धोत्रे, संमेलनाचे राष्ट्रीय संघटन मंत्री वीरेंद्रप्रकाश धोका जालना, संमेलनाचे नवनियुक्त अध्यक्ष निकेश गुप्ता अकोला, प्रांतीय महामंत्री सुदेश करवा



जालना, मारवाडी युवा मंचचे प्रदेशाध्यक्ष कैलास राठी, राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष मनोज खंडेलवाल, मारवाडी युवा मंचचे प्रांतीय महामंत्री मनोज अग्रवाल, संमेलनाचे शाखाध्यक्ष ड. सुरेश अग्रवाल, युवा मंच शाखाध्यक्ष रोहित रूगटा आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ छत्रपती शिवाजी महाराज, महाराणा प्रताप यांचे प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आला. यानंतर सतीश खोडवे यांची गणेश वंदना व स्वागत गीत होऊन अतिथींचे शाल, श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात नूतन प्रदेशाध्यक्ष निकेश गुप्ता यांनी संमेलनाची कार्यकारणी व आगामी उपक्रमाची माहिती दिली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते प्रांतीय कार्यकारणीस नियुक्तीपत्र प्रदान करून शपथ देण्यात आली. नूतन प्रांतीय कार्यकारणीत प्रांतीय अध्यक्ष निकेश गुप्ता अकोला, महामंत्री सुदेश करवा जालना, उपाध्यक्ष उमेश पंचारिया, संघटन मंत्री सुनील राठी जालना, सहमंत्री लक्ष्मीनारायण मानधना जालना, पवन जोशी जालना, जनसंपर्क अधिकारी मनीष तवरावाला जालना यांचा समावेश असून या सर्वांना माजी कॅबिनेट मंत्री रमेशचंद्र बंग यांनी शपथ दिली.यावेळी जिल्हाध्यक्षपदी सुभाष देविदान जालना, महामंत्री म्हणून सुनील बियाणी जालना, मनोज चोरडिया यवतमाळ, ड. अविन अग्रवाल अकोला तसेच जालना शहराध्यक्ष म्हणून शरद काबरा जालना, शहर सचिव म्हणून रितेश मालपाणी जालना, श्याम शर्मा अकोला आदींची निवड करण्यात आली. यावेळी विविध प्रकोष्ठची घोषणा करण्यात आली. या सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी प्रदेश कार्यकारणीला मार्गदर्शन करून मारवाडी समाजाच्या विविध जाती- घटकांच्या सामूहिक विकासासाठी सर्वांनी एकजूटतेने सेवा कार्य करण्याचे आवाहन केले. या पदग्रहण सोहळ्याला जालना मारवाड़ी युवा मंचचे अध्यक्ष महेश भक्कड़, विजय जैन, रमेशचंद्र अग्रवाल, दिनेश बरलोटा, रमेश मोदी, संजय बाहेती, पुरषोत्तम मोतीवाला, डॉ. रामनारायण जयस्वाल, गोवर्धन अग्रवाल, नरेश गुप्ता, अरुण लाहोटी, निखिल तायल, विजय गिनोडिया, सूर्यनारायण गजबी, सुनील सोनी, विरेंद्र रूनवाल, विशाल शर्मा, सौ. उर्मिला करवा, अनिल मालपानी अकोला, सौ.उमा मालपानी, प्रदीप माहेश्वरी, सौ.शशी माहेश्वरी, प्रादेशिक मारवाडी संमेलन, युवा मंच व सलग्न संस्थांचे पदाधिकारी, सदस्य, मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समृध्दी महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल



**जालना । प्रतिनिधी -** सकल मराठा समाजाच्या आंदोलकांनी दि.२५ बुधवार रोजी सकाळी साडे दहा ते पावणे दोन वाजे पर्यंत एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देवुन समृध्दी महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करून चाळीस ते पंचेचाळीस मिनिटे दोन्ही बाजूचे वाहने थांबवून गैरकायद्याची मंडळी जमवुन धारकल्याण फाटा व वरुड फाटा समृध्दी महामार्ग येथे दोन्ही बाजुने रास्ता रोको करुन प्रवाशांची गैरसोय होईल असे कृत्य केले तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उलंघन केल्या प्रकरणी दि.२५ बुधवार रोजी सायंकाळी सहा वा.एकोनीस मिनिटाच्या सुमारास तब्बल १९ आंदोलकांवर कलम १२६ (२),१८९(२),१९१(२),१९०

भारतीय न्याय संहिता सह कलम १३५ प्रमाणे तालूका जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहीती दि. २६ गुरुवार रोजी दुपारी एक वा.च्या सुमारास पोलीस सुत्राच्या वतीने मिळाली आहे.

काल मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या नववा दिवस होता दिवसेंदिवस त्यांची तब्येत खालावत जात असल्याने जिल्हाभरात विविध ठिकाणी रस्ता रोको आंदोलने करण्यात आली. त्याच्याच एक भाग म्हणून समृद्धी मार्गावरही कडवंची,नाव्हा सर्कलमधील मराठा आंदोलकांनी समृद्धी महामार्गावर रस्ता रोको आंदोलन केले होते व व टायर जाळून सरकार प्रती आपला रोष व्यक्त केला होता. या घटनेची गंभीर दखल घेत पोलीस प्रशासनाच्या वतीने १९ आंदोलकांवर तालुका जालना पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.ना. वाघमारे हे करत आहेत.

# 'त्या' खुनाचा जाफ्राबाद पोलीसांनी केला उलगडा; एक आरोपी अटकेत

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** जाफ्राबाद ते भोकरदन जाणारे रोडवर आरदखेडा फाटा या ठिकाणी काही संशयित चोरटे गुन्हा करण्याच्या उद्देशाने थांबलेले असल्याची गोपनीय माहिती दिनांक १९/०९/२०२४ रोजी पोनि प्रताप इंगळे यांना मिळाली. खात्रीशीर माहिती मिळाल्यावरून तात्काळ वरीष्ठांना माहिती देवून घटनास्थळी पोउपनि पठाडे, पोउनि नेमाणे, पोशि जाधव व सोबत पोलीस स्टाफ गेले व त्याठिकाणी एक आरोपी नामे अतिश आशोक पवार वय २५ वर्ष रा नवापूरवाडी ता गंगापुर जि छ संभाजीनगर यास ताब्यात घेतले व त्याच्या ताब्यात असलेल्या बॅगमध्ये पाहणी केली असता घरफोडीसाठी वापरण्यात येणारे साहित्य मिळून आल्याने ताब्यात घेतले. त्या ताब्यात घेतलेल्या साहित्याची पडताळणी केली असता सदरचे साहित्य हे पोस्टे जाफ्राबाद हद्दीतील कुंभारी येथे घडलेल्या घरफोडीच्या संदर्भाने असल्याने सदर आरोपीला कुंभारी येथील घरफोडीच्या अनुषंगाने दाखल झालेला गुरनं २६६/२०२४ कलम ३०५.३३१ (६)३(५) BNS मध्ये अटक करण्यात आली आहे. आरोपी हा जाफ्राबाद पोलीस कस्टडीमध्ये असतांना त्यास विश्वासात घेवून सखोल विचारपूस केली असता त्याने व त्याच्या साथीदारांनी मिळून खुलताबाद पोस्टे हद्दीतील गल्ले बोरगाव येथील शेतकरी संघटनेचे तालुका प्रमुख राजु असाराम हारदे व त्यांच्ची पत्नी सुनिता राजु हारदे यांच्या घराचा दि १७/०९/२०२४ रोजी रात्री कडी कोंडा तोडून घरात प्रवेश करून राजु असाराम हारदे यांच्या पोटात व डोक्यात चाकुने वार करून गंभीर जखमी केले. उपचारादरम्यान राजु असाराम हारदे हे मरण पावले आहे. तसेच त्यांची पत्नीला मारहाण करून गळयातील सोन्याची पोत चोरून नेली आहे. याबाबत पोस्टे खुलताबाद येथे गुरनं ०३८०/२०२४ कलम ३१०(३) व ईतर इछ्ड प्रमाणे दि १७/०९/२०२४ रोजी गुन्हा नोंद आहे.

वरील बाबत खुलताबाद पोस्टेला सविस्तर माहिती कळविण्यात आली आहे. या माहितीवरून खुलताबाद पोलीसांनी वर नमुद अरोपीबाबत मा प्रथम वर्ग न्या दं खुलताबाद यांचे प्रोडक्शन वॉरंट घेवुन मा प्रथम वर्ग न्या दं जाफ्राबाद यांच्या न्यायालयात दि २१/०९/२०२४ रोजी हजर होवुन मा न्यायालयाचा आदेश घेवून सदर आरोपीचा ताबा घेतला आहे.

सदरची कार्यवाही जिल्हा पोलीस अधिक्षक श्री अजयकुमार बंन्सल सर, अपर पोलीस अधिक्षक श्री नोपाणी सर,उप वि पो अधिकारी श्री गणपत दराडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली जाफ्राबाद पोस्टेचे पोनि श्री प्रताप इंगळे, पोउपनि पठाडे पोउपनि नेमाणे, पोउपनि पवार पोहेकों/भुतेकर, पोहेकॉ डोईफोडे, पोहेकों वैद्य, पोहेकों गावंडे, पोना पठाडे, पोना टेकाळे, पोकों जाधव, पोकों डुरे, पोकों मस्के, चापोहेकॉ डोईफोडे, पोकों मोरे यांनी केली असून तपास जाफ्राबाद पोलीस करत आहे.

## हातडी येथील २१ वर्षीय विवाहितेचा अपघाती मृत्यू

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यातील हातडी येथे बुधवारी सकाळी साडे नऊ च्या दरम्यान टिप्पर व मोटरसायकल चा अपघात झाला.यात एका २१ वर्षे विवाहितेचा मृत्यू झाल्याचे अत्यंत दुखद घटना घडली आहे.या प्रकरणी अज्ञात टिपर चालका विरोधात परतूर पोलिस स्टेशन ला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहित मुलगी वैष्णवी अभिमन्यू खेत्रे असे मृत महिलेचे नाव आहे अपघातानंतर एम एच २९ बी आर १३३९ या क्रमांकाच्या टिप्परचा चालक घटनास्थळावरून पसार झाला भिकाजी बोरकर यांच्या फिर्यादीवरून टिप्पर चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## मोदींच्या जीवाला धोका असल्याचा फेक कॉल; पोलीसांची उडाली तारांबळ

**पुणे -** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी (झच् छ्रीशपवीर चेवळ) हे आज पुणे दौऱ्यावर येणार होते, त्यांचा आजचा दौरा मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवल्याने रद्द झाला, मात्र, नरेंद्र मोदी पुणे दौऱ्यावर येणार असताना पिंपरी चिंचवडच्या कंट्रोल रूमला मोदींच्या जीवाला धोका, त्यांना वाचवा असा कॉल आला होता, या फेक कॉलमुळे पोलिसांची तारांबळ उडाली. हा कॉल आल्याने खळबळ उडाली. त्यानंतर या प्रकरणाचा तपास सुरू झाला. या प्रकरणात पोलिसांनी एकाला ताब्यात घेतलं आहे.

# पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्याकडून पैसे न घेता रक्कम तात्काळ खात्यात वर्ग करा

नगरपंचायत वर धडक मोर्चा

**दत्ता देशमुख**

**जाफ्राबाद -** बहुचर्चित पंतप्रधान घरकुल योजना केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयातुन साकार झालेली असुन सन २०१६ ला कामाला देखील सुरुवात झालेली आहे. गरीबांना हक्काचे घर मिळणार असल्याने या योजनेसाठी सन २०१८ मध्ये नगरपंचायतीच्या वतीने अर्ज मागविण्यात आले होते. दरम्यान, पाचवा हप्ता मिळविण्यासाठी ५ हजार रुपये नगरविकासासाठी द्यावा लागेल असे फर्मान जाफराबाद नगरपंचायत प्रशासनाने सोडल्यानंतर नगरपंचायतच्या या धोरणा विरोधात मंगळवारी रोजी पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून नगरपंचायतीच्या ध्येय धोरण विरोधात हातात विविध फलक घेऊन नगरपंचायत वर मोर्चा काढला.



यासाठी पहील्या टप्प्यात १ हजार ६०० अर्ज प्राप्त झाले होते यापैकी पहील्या टप्प्यात ७५० तर दुसऱ्या टप्प्यात १ हजार तर तिसऱ्या टप्यात ३ ९४ अशा प्रकारे तिन टप्पे मिळुन २ हजार १४४ घरकुंलाना मंजुरी मिळालेली आहे.

या योजनेसाठी राज्यशासनाकडून एक लाख तर केंद्र शासनाकडून दिड लाख असे अडीच लाखांचे अनुदान दिल्या जाते.प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केल्यावर पहीला चाळीस हजाराचा हप्ता लाभार्थ्यांना दिला जातो तर शहरात ७५० लाभार्थ्यांना ४० हजाराच्या पहील्या हप्त्याचा तेव्हाच ३कोटी रुपये निधी प्राप्त झालेला होता तर काही महिन्याआधी पहिल्या टप्प्यातील ७५० पैकी ६०९ पेक्षाही अधिक घरकुलांचे बांधकामे सुरु झालेली होती यात जवळपास ४०४ घरकुलांची बांधकामे पूर्णत्वास जाऊन त्यामध्ये लाभार्थी राहण्याचे गेलेले आहे या या लाभार्थ्यांना चार हप्त्यांचे मिळून १ लाख ९५ हजार रुपये मिळालेले आहे तर काहींना दोन लाख रुपये मिळालेले आहे आहेत मात्र यातील अनेकांची कामे गेल्या अडीच वर्षापासुन पाचवा हप्ता न मिळाल्याने कामे थांबलेली आहे.

मात्र यावेळी नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी घरकुल मंजूर होण्यापासून तर प्रत्येक हप्ता मिळेपर्यंत लाभार्थ्याकडून पैसे उकळण्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी कडून होत होता शहरातील पंतप्रधान आवास योजनेत तिन टप्पे मिळून दोन हजाराच्याही वर लाभार्थी असून अडीच वर्षापासून शेवटचा पाचवा हप्ता रखडलेला आहे मात्र आता तो हप्ता मिळणार असल्याची चर्चा होवू लागली असतानाच या हप्त्यासाठी नगरपंचायत कर्मचारी लाभार्थ्यां कडून ५ हजार रुपये द्या नसता तुमचा उर्वरित हप्ता मिळणार नाही अशी बतावणी करून पैसे उकळीत असल्याचा आरोप मोर्चेकऱ्यांनी करून मंगळवारी युवा कार्यकर्ते तथा समाजसेवक संदीप भवर यांच्या नेतृत्वाखाली लाभार्थींनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात एकत्र जमून नगरपंचायत वर मोर्चा काढला व गरीब लाभार्थ्याकडून पैसे घेऊ नका रखडलेला पाचवा हप्ता त्वरित लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करा या प्रकरणाची चौकशी करा या मागणीचे निवेदन लाभार्थ्यांनी मुख्याधिकारी सुरज बिस्किटे यांना दिले.

यावेळी पोलिस निरीक्षक प्रताप इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी रविंद्र भारद्वाज, शेकशिम,बबलु जोडीवाले,सलमान खान,विजय बोर्डे,विठ्ठल वखरे,योगेश भारद्वाज,शेख मोहसीन, गोफणे,संतोष वखरे,पवन ठाकूर, अक्षय भारद्वाज, गोपाल दुबे, सय्यद पाशु,गोपाल बऱ्हाटे, गफ्फार कुरेशी,अनिल छडीदार, शाम कुमार ढवळे ,शुभम लोखंडेयांच्यासह शेकडो लाभार्थी या मोर्चात सहभागी झाले होते.

## परतूरात आधार कार्ड अपडेटसाठी कॅम्प - तहसीलदार

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर तालुक्यात संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थींना डीबीटी मार्फत त्यांच्या खात्यात पैसे जमा करण्यात येणार आहेत. त्यासाठी लाभार्थ्यांना आपल्या खात्याशी आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांक लिंक करावा लागणार आहे.

संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेत असलेल्या पात्र निराधार लाभार्थी यांचेकडून बँक खात्याला आधार कार्ड व मोबाईल क्रमांक संलग्न करुन संकलित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे परतूर शहरातील लाभार्थींनी विहीत मुदतीत आवश्यक ती कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. जे लाभार्थी सदर कागदपत्रे या कार्यालयास सादर करणार नाहीत त्यांचा लाभ बंद झाल्यास त्यासाठी लाभार्थी स्वतः सर्वस्वी जबाबतदार राहील याची नोंद घ्यावी असे आवाहन तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी केले आहे.

परतूर शहरातील संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांनसाठी सूचना ई- आधार कार्ड काढण्यासाठी दिनांक २८ सप्टेंबर २०२४ रोजी आधार कार्ड कॅम्पचे आयोजन अहिल्याबाई होळकर सभागृह नगर परिषद जवळ परतूर येथे करण्यात आले आहे.तरी सर्व लाभार्थ्यांनी स्वतः उपस्थित राहून जूने आधार कार्ड व मोबाईल क्रमांक यासह आयोजित कॅम्प मध्ये ई- आधार कार्ड काढून ई- आधार कार्ड ची प्रत हयात प्रमाणपत्र, बँक पासबूक झेरॉक्स प्रत, मोबाईल क्रमांक योजनेबाबत पुराव्याची झेरॉक्स प्रत अशी सर्व कागदपत्रे दिनांक ३० सप्टेंबर २०२४ पूर्वी संजय गांधी विभाग तहसिल कार्यालय परतूर येथे समक्ष सादर करण्यात यावी असे श्रीमती गोरे यांनी सांगितले आहे.

# भिमा कोरेगाव प्रकरणातील तरुणावरील गुन्हे मागे घ्या

## विकास लहाने यांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण



**जालना । प्रतिनिधी -** सरकार बौध्द तरुणांची दिशाभुल करीत असून त्यांना गुन्हेगार म्हणून साबीत करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांच्या खोट्या आश्वासनामुळे बौध्द समाजातील तरुणांचे प्रश्न प्रलंबीत आहेत. भिमा कोरेगाव प्रकरणातील तसेच न्याय हक्कासाठी केलेल्या आंदोलनातील गुन्हे मागे घेण्याचं आश्वासन सरकारने दिले होते. परंतु, आजपर्यत हे गुन्हे मागे घेतलेले नाहीत. त्यामुळे हजारो तरुणांना नोकर्यापासून वंचित रहावे लागेल आहे. परंतु, आता बौध्द समाजाला जागृत करुन त्यांना न्याय हक्कासाठी पुन्हा मैदानात उतरावे लागणार आहे. त्यामुळे भिमा कोरेगाव प्रकरणातील व इतर आंदोलनाचे गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत अन्यथा पुन्हा तिव्र स्वरुपाचे आंदोलन करावे लागेल आणि बौध्द समाज रस्त्यावर उतरला तर सरकारला महागात पडेल, असा इशारा बौध्द आंदोलक विकास लहाने यांनी दिला आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी न्याय हक्कासाठी लढा उभा केल्याने सरकारच्या नाकी दम आला आहे. त्याच बरोबर ओबीसी समाज देखील रस्त्यावर उतरला असून आंदोलन करीत आहे. आता बौध्द समाज देखील आंदोलनाच्या पवित्र्यात असून सरकारची कोंडी करणार आहेत. विकास लहाने यांनी दि. १९ सप्टेंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केलंय. त्यामुळे त्यांची तब्येत खराब होत आहे. परंतु, सरकार आणि जिल्हा प्रशासन त्याकडे लक्ष देत नसल्याने समाज आक्रमक भुमीका घेण्याची शक्यता आहे. विकास लहाने यांना समाजाचा आणि समाजातील विविध संघटना, पक्ष यांचा पाठींबा देखील वाढत आहे. जर वेळीच याकडे लक्ष दिलं नाही तर रस्त्यावर उतरावं लागेल असेही विकस लहाने यांनी म्हटलंय.

या संदर्भात विकास लहाने यांनी सरकारला निवेदन सादर केलंय. SC/ST वर्गीकरण व क्रिमीलरची अट रद्द करावी, शेतकर्यांना सन २०२३-२४ पर्यंत सरसगट कर्जमाफी देण्यात यावी. गायरान धारक शेतकरी यांच्या ताब्यात असलेल्या जमीनीच्या नोंदी ७/१२ उतार्यावर घेण्यात याव्यात. रमाई घरकुल व पंतप्रधान आवास योजनेमधील ग्रामीण भागातील रहिवाशांना अनुदान ५ लाख पर्यंत करण्यात यावे. शहरी झोपडपट्टी मधील रहिवाशांना रमाई घरकुल व पंतप्रधान आवास योजनेमधील पी. आर. कार्डची अट रद्द करण्यात यावी व त्याचे अनुदान ५ लाख पर्यंत करण्यात यावे. महात्मा फुले विकास महामंडळ अंतर्गत उद्योजकांना ५० लाख पर्यंत बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे. जालना येथील मोतीबाग तलावातील प्रलंबीत भगवान बुद्धाची मुर्ती बसवण्यात यावी. नागपूर येथील दिक्षाभूमी आंदोलक भिमसैनिक यांच्या वरिल गुन्हे मागे घेण्यात यावे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील विमानतळाचे तथागत भगवान बुध्द असे नामकरण करण्यात यावे दादर रेल्वे स्टेशनचे नामकरण चैत्यभूमी करण्यात यावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजना विहिरीसाठी ५ लाख पर्यंत अनुदान वाढवावे. १ ली ते प्रत्येक क्षेत्रातील उच्च शिक्षण मोफत करावे. भिमा कोरेगाव प्रकरणातील दंगलीमधील भिमसैनिकावरील गुन्हे मागे घेण्यात यावे. समाज कल्याण विभागाचा निधी ईतरत्र न वापरता केवळ एस.सी. व एस.टी. प्रवर्गाच्या कल्याणकारी योजने करिता वापरावा. आदी मागण्या त्यांनी केल्या.

यावेळी उपोषणकर्ते विकास लहाने यांच्यासह प्रमोद खरात, बंडु सुरडकर, दादाराव लहाने, ॲड. योगेश गाडगे, अण्णासाहेब चितेकर, सिध्दार्थ पवार, आनंद म्हस्के, फकीरा काकडे, प्रदिप ढील्पे, ॲड. सुधाकर जाधव, विष्णु रौंदळे, राहुल खरात यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### दोन रेशन दुकान असुन गोरगरीब जनतेला रेशन मिळत नसल्याची तक्रार

# चंदनझीरा येथील नागरीकांची तहसीलदारांकडे धाव

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील चंदनझीरा ही वस्ती कामगार वस्ती म्हणून ओळखल्या जाते.येथील राहीवाशी मोलमजूरी करून आपला उदर्निवाह करतात मात्र राशन दुकानावर येथील बऱ्याच नागरीकांना राशन मिळतनसल्याची तक्रार अनेक नागरीकांची आहे.

त्या अनुषंगाने चंदनझीरा येथील सुज्ञ नागरीकांनी आज दि.२६ गुरूवार रोजी दुपारी तीन वा.च्या सुमारास जालना तहसीलदार यांची भेट घेऊन राशन दुकानाच्या बाबतीत तहसीलदार यांना निवेदनाद्वारे लेखी तक्रार दिली.

चंदनझिरा येथे दोन रेशन दुकान असुन गोरगरीब जनतेला रेशन मिळत नाही. जर एखादा व्यक्ती दुकानदाराकडे गेला तर तो म्हणतो तहसिल कार्यालययात जा आणि तहसिलला आले तर येथे सांगतात रेशन दुकानदारकडे जा. आणि जर पैसे देऊन घेऊन केले तर लवकरात लवकर काम होते. याचा अर्थ येथुन तेथुन साखळीच आहे मग गरीब जनतेने कोणाकडे दाद मागायची. आज घडीला चंदनझिऱ्याची लोक संख्या पस्तीस हजाराच्या जवळपास आहे. आणि आपल्या तहसिलला किती रेशन कार्ड वितरीत केलेले आहे हे तपासुन जे लोकं या पासुन वंचित राहीले आहे त्यांना तहसिल मार्फत कार्ड देण्यात यावे व या लोकांना रेशनचा लाभ मिळावा अशा आशयाचे निवेदन चंदनझीरा वाशियांच्या वतीने तहसीलदार जालना यांना देण्यात आले.



यावेळी चंदनझीरा येथील जगन्नाथ चव्हाण,विश्वंभर तिरुखे,प्रल्हाद देठे,शिवाजी झोल ई. ची उपस्थिती होती.

## राज्यसेवा परीक्षेची गुणवत्ता यादी जाहीर

**मुंबई -** राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२३ या परीक्षेसाठी सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यामध्ये महेश अरविंद घाटुळे यांने बाजी मारली आहे. प्रितम मधुकर सानप यांने दुसरा क्रमांक पटकावला आहे. तर वैष्णवी हरिभाऊ बावस्कर हिने मुलींमध्ये पहिला क्रमांक पटकावला आहे. आता उमेदवारांना आपल्या पदांचे पसंतीक्रम द्यावे लागणार असून त्यानंतर अंतिम निकाल जाहीर करण्यात येणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून २०२३ साली गट अ आणि गट ब दर्जाच्या ३०३ पदांसाठी परीक्षा घेण्यात आली होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाना जाहीर केलेली ही गुणवत्ता यादी ही तातपुरत्या स्वरूपाची आहे.

## जिल्हा कोषागार कार्यालयाचे सेवानिवृत्तीवेतन धारकांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना कोषागारामार्फत सेवानिवृत्तीवेतन घेणाऱ्या सर्व निवृत्तीवेतन धारकांनी आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये एकत्रित निवृत्ती वेतन रु. ५ लाख ५० हजार रुपयांपेक्षा जास्त आहे. त्यांनी आयकर अधिनियम १९६१ कलम ८० सी नुसार केलेल्या गुंतवणुकीची, बचतीची कागदपत्राची छायांकित प्रत दि. १४ ऑक्टोंबर २०२४ पूर्वी पीपीओ क्रमांक, पेन्शनचे बँक खाते क्रमांक आणि पॅन कार्ड छायाकिंत प्रतीसह कोषागार कार्यालय, जालना येथे सादर करावीत.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात आयकर कायद्यामध्ये बदल करण्यात आले आहेत. आयकर विभागाच्या आयकर वसुलीचे नवीन सेक्शन ११५ नुसार आयकर गणनेसाठी न्यु टॅक्स रिजीम व जुनी टॅक्स रिजीम असे दोन प्रकार ठरविण्यात आले आहेत. तरी आपण योग्य असणारा पर्याय निवडावा, आपण निवडलेले पर्याय कोषागार कार्यालयास नाव, पीपीओ क्रमांक, बँक व शाखेसहीत कळविण्यात यावे. जेणेकरुन आपण निवडलेल्या पर्यायानुसार देय होणारी टीडीएस वजाती करता येईल. असे जिल्हा कोषागार अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी भरीव अशी आर्थिक तरतूद होईल- खोतकर



**जालना । प्रतिनिधी -** ब्राह्मण समाजातील बेरोजगार तरुणांच्या समृद्धीसाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, ही मागणी आपण सातत्याने लावून धरली, आता हे महामंडळ स्थापन झाले असून या महामंडळास राज्य सरकार भरीव अशी आर्थिक तरतूद करून ब्राह्मण समाजातील तरुणांच्या कल्याणाचा मार्ग मोकळा करतील, असा आशावाद माजी मंत्री तथा शिवसेनेचे उपनेते अर्जूनराव खोतकर यांनी आज ( दि. २६) येथे व्यक्त केला.

राज्य सरकारने परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन केल्याची घोषणा केल्यानंतर या महामंडळाच्या मागणीसाठी पुढाकार घेतल्याबद्दल जालना शहरातील सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने खोतकर यांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर,अ.भा, बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुरेश मुळे, ड. सुनील किनगावकर, रवींद्र देशपांडे,आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना खोतकर पुढे म्हणाले की, प्रत्येक समाज घटकांना आर्थिक उन्नती हवी असते, त्यासाठी हे समाज घटक सतत लढा उभारत असतात. सुरेश मुळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपल्याकडे परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी केली होती. आपणही विधानसभेत ब्राह्मण समाजातील तरुणांच्या आर्थिक समृद्धीसाठी हे महामंडळ स्थापन करावे, अशी मागणी लावून धरली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी आपण केलेली मागणी तसेच ब्राह्मण समाजाच्या याविषयीच्या भावना

विचारात घेऊन परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची घोषणा केली, ही आपल्यासाठी व समस्त ब्राह्मण समाजासाठी आनंदाची बाब आहे. आता हे महामंडळ स्थापन झाले आहे, महामंडळास राज्य सरकार भरीव अशी आर्थिक तरतूद करून देतील, याची आपणास खात्री असल्याचे खोतकर यांनी यावेळी सांगितले.

यावेळी बोलतांना सुरेश मुळे यांनी माजी मंत्री अर्जूनराव खोतकर यांनी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन व्हावे, ही मागणी लावून धरल्याबद्दल खोतकर यांचे समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने आभार मानले. ड. सुनील किनगाकर यांनीही परशुराम आर्थिक विकास महामंडळाची मागणी लावून धरल्याबद्दल खोतकर यांचे आभार मानले.

यावेळी रवींद्र देशपांडे, भगवान पुराणिक, सखाराम लंके, राजेश काळे , शिवसेनेचे,कांताराव रांजणकर, समितीचे संचालक तुकाराम जी खर्जुले संजय वाघ, विभाग प्रमुख कांतराव रांजणकर यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.